स्थायी समितीच्या **गुरुवार** दिनांक **28–01–2010** रोजी दुपारी **03–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. भिसीकर प्रविण विलास | अध्यक्ष |
| 2. | श्री. नरेंद्र उर्फ बाल्या बोरकर | सदस्य |
| 3. | श्री. मुळे अशोक प्रभाकर | सदस्य |
| 4. | श्रीमती. तारा ओमप्रकाश उर्फ लक्ष्मी मुन्ना यादव | सदस्या |
| 5. | श्री. धुरडे दिपक मोरेश्वर | सदस्य |
| 6. | श्री. असलम खा. | सदस्य |
| 7. | श्री. सिराज अहमद | सदस्य |
| 8. | श्री. डडमवार श्याम भास्करराव | सदस्य |
| 9. | श्री. काटले अशोक राजाराम | सदस्य |
| 10. | श्री. वालदे विनोद परसराम | सदस्य |
| 11. | श्री. धोटे मोरेश्वर उर्फ मामा गुलाबरावजी | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. बाबरा रजींदरसिंग अजायबसिंग | सदस्य |

रिक्त स्थान – 4

## उपस्थित अधिकारी

1) श्री. अजय रामटेके, अति. उपायुक्त
2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक</u> 232 :– वार्ड क्र. 132, आशिर्वाद नगर भागातील ताजबाग शहेंशाह चौक ते रिंग रोड (द्वारका कॉम्पलेक्स) पर्यंतच्या रस्त्यांचे खडीकरण, फुटपाथ, नाली व डांबरीकरणाचे कामाच्या निविदेस, (राशी रू. 1,27,91,796/–) स्थायी समिती ठराव क्र. 630 दिनांक 11/02/2009 व सुधारीत ठराव क्र. 693 दिनांक 02/03/2009 अन्वये मंजूरी प्राप्त असुन सन 2008–09 या आर्थिक वर्षात रू. 20 लक्ष प्रावधान देण्यांत आले होते. तरी आर्थिक वर्षे 2009–10 मध्ये उर्वरीत प्रावधान राशी रू. 1,07,91,796/– पद क्र. 481 अंतर्गत उपलब्ध करून देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली, तसेच हे मागील वर्षीय अपूर्ण काम असल्यामुळे या कामास पद क्र. 481 जुने देणे मधुन प्रावधान देऊन कार्यादेश देण्यात यावा यावा असा समितीने एकमताने निर्णय घेतला.

<u>ठराव क्रमांक 233</u> :– वार्ड क्र. 26, येथील भावना किराणा स्टोअर्स ते निर्मलकर निवास रिंग रोड पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण, रुंदीकरण व बांधकामास्तव ठराव क्र. 660 दिनांक 24.04.2009 अन्वये मे. एल.सी. गुरुबक्षानी यांची प्राकलनीय दरापेक्षा 9.90 टक्के कमी दराची रु. 43,53,019/– राशीची निविदा मंजूर असून सन 2008–09 मध्ये रु. 15 लक्ष राशी पर्यंतचे कार्यादेश देण्यात आले आहे. उर्वरित कामाचे रु. 28,53,000/– राशीचे मे. एल.सी. गुरुबक्षानी, यांना उपरोलीखीत ठरावानुसार मंजूर दराने कार्यादेश पद क्र. 481 अंतर्गत निर्गमित करण्यास्तव मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 234</u> :– वॉर्ड क्र. 129, प्रोग्रसीव्ह ले–आऊट येथील इंद्रप्रस्थ रेस्टॉरेंट ते रमाणा मारोती हार्डवेअर पर्यंतच्या रस्त्याचे फुटपाथ, रुंदीकरण व डांबरीकरणाचे कामास्तव मे. एल.सी. गुरुबक्षानी, यांची प्राकलनीय दरापेक्षा 10.71 टक्के कमी दराची रु. 41,61,807/– राशीची निविदा मंजूर असून सन 2008–09 अंतर्गत उपलब्ध प्रावधान रु. 15,00,000/– राशी पर्यंतचे काम सिमीत ठेवण्यात आले. उर्वरित कामाचे रु. 26,61,807/– राशीचे कार्यादेश, आर्थिक वर्ष 2009–10 मध्ये पद क्र. 481 अंतर्गत देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 235</u> :– नागपूर महानगरपालिकेत कार्यरत वाहनांची/मशीनची कारखाना विभागातर्फे देखभाल व दूरूस्ती केल्या जात असुन वाहनांचे/मशीन्स सुटे भाग विकणारे आटो मोबाईल क्षेत्रातील अधिकृत विक्रेते ज्यांच्याकडे वाहन दूरूस्तीकरीता संलग्न वाहन दूरूस्ती केंद्र (गॅरेज) उपलब्ध आहे व त्या उलट किंवा ऑटोमोबाईल क्षेत्रातील असे अधिकृत विक्रेता ज्यांच्याकडे सुटे भाग उपलब्ध असुन एखादा चांगल्या वाहन दूरूस्ती केंद्रासोबत ज्यांनी पंजीकृत करारनामा केला आहे अश्या निवेदेतील सहभागी विक्रेता/गॅरेजकडून वाहनाची दूरूस्ती आणि वाहनांना लागणारे

सुटे भाग, टायर टयुब फ्लॅप खरेदी दूरूस्ती, बॅटरी खरेदी, हार्डवेअर मटेरियल्स खरेदी, सिव्हरलाईन मशीन, स्पेअर पार्ट खरेदी/दूरूस्ती, बॉडी बिल्डींग/व्हिल बॅरोज/लिटर बिन ईत्यादी खरेदी दूरूस्तीकरीता जाहीर ई–निविदा मागविण्यांत आल्या. त्या अनुषंगाने ई–निविदा उघडण्यांत येवून निविदाकारांच्या प्राप्त दरांच्या वर्गीकरणासह तुलनात्मक तक्ता तयार करण्यांत येवून विभागान निम्नतम दराची आयटमनुसार दरसूची तयार केली आहे.

निविदेच्या अंतर्गत वेगवेगळया ॲटमकरीता वेगवेगळया संबंधीत निविदाधारकाचे वेगवेगळे दर असल्यामुळे प्रत्येक ॲटम करीता विभागाला प्राप्त दर (निम्नतम) हे सिलींग दर म्हणून त्या–त्या स्पेअर्स वा दूरूस्ती ॲटमकरीता निश्चित धरण्यांत येवून ज्या निविदाधारकाने संबंधीत ॲटमचे स्पेअर्स वा दूरूस्ती करण्यांस अथवा साहित्याचे दर सादर केलेत त्यांच्याकडून निम्नतम दरावर स्पेअर्स खरेदी व दूरूस्ती करण्यांस प्रथम प्राधान्य देण्याची विभागाची शिफारस आहे. तसेच निम्नतम दर असलेले निविदाधारक यांना सदर दरात साहित्य देण्यांस व दूरूस्तीस काही तांत्रीक अडचण उद्‌भवल्यास त्याच निम्नतम दरावर इतर संबंधीत निविदा धारकाकडून स्पेअर्स पूरवठा अथवा दूरूस्ती काम करून घेण्यांची तसेच आरोग्य विभागाला लागणारे काही साहित्याचे दर अंतर्भूत असुन सदर दरावर साहित्य संबंधीत पदातुन खरेदी करण्यांची विभागाची शिफारस आहे.

उपरोक्त दर हे प्रस्तावाच्या मंजूरीनंतर दरकरार म्हणून दोन वर्षाचे कालावधीकरीता ग्राहय धरण्यांत येवून विभागाने दर्शविलेल्या ज्या स्पेअर व दूरूस्ती आयटमचे दर निविदाधारकांना भरलेले नसतील असे ॲटम किंवा सूची अंतर्गत समाविष्ट नसलेले आयटम हे प्रोफोरमा इन्व्हाईस/आवेदनाद्वारे खरेदी अथवा दूरूस्ती करण्यांची शिफारस असुन विभागाला प्राप्त निम्नतम दरकरार म्हणून स्विकृती करण्यांचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 236</u> :– नविन प्रशासकीय इमारतीचे इंटेरीयर कामाची मे. विपीन शाह एण्ड असोसिएट्स यांची रुपये 7,80,06,800,00/– या रकमेची प्राकलनीय दरापेक्षा 15.21 टक्के कमी दराची मा. स्थायी समिती ठराव क्रं. 15 दि. 18.5.2009 अन्वये नामंजूर करण्यात आली आणि कारपेन्ट्री फर्निचर एवजी माडयुलर फर्निचरची लघुनिविदा व इतर स्थापत्य कामाची स्वतंत्रलघुनिविदा काढण्याचे निर्देशीत केले.

या अनुषंगाने तिन नामवंत मॉडयुलर कंपण्याकडून या कामचे अंदाजपत्रक मागविले असता फक्त कारपेन्ट्री फर्निचरच्या किमतीच्या (रु. 6,053,397.00) अनुषगांने मॉडयुलर फर्निचरची किंमत (रु. 8,31,39,807.00) जवळपास 37 टक्के किमतीची वाढ होणे अपेक्षीत आहे (रु. 2.25 कोटी) फर्निचरची मजबूती व टिकावू पणाच्या दृष्टीने विचार केल्यास कारपेन्ट्री फर्निचर करणे योग्य राहील असे मत सादर करण्यात येत आहे.

करीता हा प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे पुनःविचारास्तव सादर प्रस्तुत केलेला विषय समितीने विचारात घेऊन हा विषय कार्यालयास परत करण्यात येतो व मॉडयुलर फर्निचरची लघू निविदा (संम्पूर्ण रकमेची) काढण्यांत यावी असा समितीने एकमताने निर्णय घेतला.

<u>ठराव क्रमांक 237</u> :– वार्ड क्र. 82,शंकरनगर व दंडीके ले आऊट येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रु. 24,99,904/– च्या प्राकलनास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 238</u> :– वार्ड क्र. 86, गांधीनगर डागा ले–आऊट येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रु. 24,99,887/– च्या प्राकलनास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 239</u> :– वार्ड क्र. 87, लक्ष्मीनगर, बजाजनगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रु. 49,52,270/– च्या प्राकलनास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 240</u> :– वार्ड क्र. 59, वर्धमाननगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रु. 15,57,704/– च्या प्राकलनास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 241</u> :– वार्ड क्र. 89, मेडीकल अंतर्गत वंजारीनगर येथे डांबरीकरण तसेच इंटर लॉकींग ब्लॉक पेव्हमेंट बसविण्याचे कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रु. 25,05,015/– च्या प्राकलनास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 242</u> :– वार्ड क्र. 117, स्वांवलबीनगर, येथील श्री. नानाजी शामकुळे साहेब यांचे घरापासून ते शास्त्री ले–आऊट पर्यत रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याचा कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रु. 14,98,950/– च्या प्राकलनास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 243</u> :– वार्ड क्र. 118, मधील रस्त्यांचे रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रु. 24,99,990/– च्या प्राकलनास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 244** :– वार्ड क्र. 119, स्नेहसंवर्धक येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रु. 9,99,870/– च्या प्राकलनास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 245** :– वार्ड क्र. 119, स्नेहनगर पेट्रोल पंप ते पुराणीक यांचे घरापर्यत रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रु. 9,02,940/– च्या प्राकलनास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 246** :– वार्ड क्र. 119, राजीवनगर येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रु. 9,99,825/– च्या प्राकलनास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 247** :– वार्ड क्र. 110, एस.ई.रेल्वे कॉलोनी, अत्रे ले आऊट, टोपे नगर,इनकम टॅक्स कॉलोनी, विद्याविहार कॉलोनी येथील रस्त्यांचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रु. 49,92,075/– च्या प्राकलनास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 248** :– वार्ड क्र. 34, श्रीरामवाडी व प्रेमनगर भागात रस्त्यांचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याचे कामास्तव रु. 29,99,650/– राशीचे प्राकलनास व प्रावधान उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 249** :– वार्ड क्र. 120, कर्वे नगर उज्वल नगर येथील रस्त्यांचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रु. 19,94,430/– च्या प्राकलनास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 250** :– वार्ड क्र. 109, रामकृष्ण नगर येथील रस्त्यांचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रु. 24,99,960/– च्या प्राकलनास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 251** :– वार्ड क्र. 34, श्रीरामवाडी, प्रेमनगर, नारायण पेठ येथे भुमीगत नाली टाकण्यास्तव रु. 9,93,850/– राशीचे प्राकलनास व

प्रावधान उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 252 :– महानगरपालिकेच्या हॉटमिक्स प्लॉट विभागाकरिता रस्ते बांधकाम साहित्य जसे विविध आकाराची खडी (उदा. 40 मि.मी., 20 मि.मी., 6 मि.मी.,) खरेदी करण्याकरीता प्राप्त निविदांपैकी, मे. आर. बी. केवलरामानी यांची प्राकलनिय दरापेक्षा 38.95 टक्के कमी दराची रु. 24,38,893/– निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 253 :– वार्ड क्र. 60, हिवरी ले–आऊट व शास्त्रीनगर भागात रस्त्याच्या विकास करण्यास्तव मे. एल.सी. गुरुबक्षानी, यांची प्राकलनिय दरापेक्षा 13.55 टक्के कमी दराची रु. 15,69,558/–राशीची निविदा मंजूर असून उपलब्ध प्रावधान रु. 3,61,710/– राशी पर्यतचे काम सिमीत ठेवण्यात आले. उर्वरित कामाचे रु. 12,07,848/– राशीचे कार्यादेश आर्थिक वर्ष 2009–10 मध्ये पद क्र. 472 अंतर्गत देण्यास्तव प्रावधान उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 254 :– वार्ड क्र. 77,मध्ये राहतेकरवाडी कर्नलबाग येथील भुतिया दरवाजा चौक ते मांगपूरा नागनदी फरस पर्यत रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता निविदा मागविण्यात आल्या असता मे. ओ.जी बजाज यांची प्राकलनिय दरापेक्षा 19.18 टक्के नि कमी असलेली रु. 2888547/– ची निम्नतम निविदा प्राप्त आहे. या निविदेस मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 255 :– वार्ड क्र. 99, येथील दर्शन कॉलनी परिसरातील रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरणाचे कामास्तव मे.एस. के. गुरुबक्षानी, यांची प्राकलनिय दरापेक्षा 22.95 टक्के कमी दराची रु. 96,61,300/–राशीच्या निविदेस स्था.स. ची मंजूरी असून सन 2008–09 अंतर्गत उपलब्ध प्रावधान रु. 30.00 लक्ष राशी पर्यतचे काम सिमीत ठेवण्यात आले. उर्वरित कामास्तव मे. एस.के. गुरुबक्षानी यांना रु. 66,61,299/– राशीचे कार्यादेश, आर्थिक वर्ष 2009–10 मध्ये पद क्र. 481 अंतर्गत देण्यास्तव व प्रावधान उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली तसेच मागील वर्षीचे अपुर्ण काम असल्यामुळे हे काम पद क्र. 481 जुने देण्यामधुन प्राधान्य देऊन कार्यादेश देण्यांत यावा असाही समितीने एकमताने निर्णय घेतला.

**ठराव क्रमांक 256 :–** वार्ड क्र. 38 गुरुनानकपूरा उद्यानातील विविध स्थापत्ये कामाकरिता निविदा मागविण्यात आली असता मे. बालाजी इंटरप्रायझेस यांची प्राकलनीय दरापेक्षा 18.77 टक्के प्रतिशत कमी असलेल्या रु. 10,99,937/– रु. किंमतीच्या निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 257 :– आरोग्य विभागाच्या विविध झोन अंतर्गत चोकेज काढण्याकरिता स्टील रॉड खरेदीच्या दोन वर्षाकरीता निविदा मागविण्यात आल्या त्यामध्ये (1) मे. न्यु इंडिया सेल्स, कंपनी, नागपूर व (2) मे. रॉयल इंजीनियरिंग स्टोर्स, नागपूर या दोन्ही कंत्राटदाराचे स्टील रॉडचे समान दर रु. 457/– प्रती नग प्राप्त झाले आहे. सद्या 5000 नग रॉड खरेदीवर प्रती नग 457/– प्रमाणे रु. 22,85,000/– खर्च अपेक्षीत आहे. आवश्यकते नुसार उर्वरित खरेदी करण्यात येईल. हा खर्च पद क्र. 348,270 किंवा उपलब्ध प्रावधानामधून भागविण्याचा व मंजूर निविदा दरावर साहित्य खरेदी करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 258 :– आरोग्य विभागाच्या विविध झोन अंतर्गत येणाऱ्या भुमीगत नाल्या (सिवर लाईन्स) वारंवार तुंबु नये म्हणून त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना (Preventive Maintenance) करण्यासाठी हाय कॅपेसिटी सक्शन व जेटींग रिसायक्लींग यंत्रणेचे दोन संच 7 वर्षासाठी भाडे तत्वावर घेण्याकरिता निविदा मागविण्याच्या प्रस्ताव असून प्रथम एक संच सात वर्षाच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर घेण्यात येईल व सदरचे काम सामाधानकारक आढळल्यास एका वर्षानंतर दुसरा संच पुढील सात वर्षाकरीता समान दरांवर भाडे तत्वावर घेण्यात येईल. दोन संच घेतल्यास प्रती वर्ष रु. 2,88,00,000/– खर्च तसेच 10 टक्के अतिरिक्त वाढ प्रती वर्ष द्यावी लागेल. हा खर्च पद क्र. 334 मधून भागविण्यात येईल. या कामासाठी अतिरिक्त प्रावधानाची तरतूद करुन निविदा काढण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली. तसेच या कामाची लघु निविदा काढण्यांत यावी असाही समितीने एकमताने निर्णय घेतला.

ठराव क्रमांक 259 :– वॉर्ड क्र. धंतोली झोन क्र. 4, मधील फुटपाथ व पुनडांबरीकरण तसेच पॉट होल्स दुरुस्तीचे कामास्तव दोन सारख्याच दराच्या प्राप्त मे. पी.एम. ए. कन्स्ट्रक्शन व मे. डी.सी. गुरुबक्षाणी यांच्या प्राकलनीय दरापेक्षा 24.65 टक्के नी अधिक दराच्या रु. 263.27 लक्ष राशीच्या निम्नतम निविदेस स्थायी समिती ठराव क्र. 309, दि. 02.12.08 अन्वये मंजूरी प्राप्त आहे. सन 2008–09 मध्ये उपलब्ध प्रावधान रु. 1.00 कोटी पर्यत काम सिमीत ठेवण्यात आले

उर्वरित काम पूर्ण करण्याकरिता सन 2009–10 मध्ये दोन्ही निविदेकाराकडून अनुक्रमे मे. पी.एम. ए. कन्स्ट्रक्शन यांना रु. 82,71,299 व मे. डी.सी. गुरुबक्षाणी यांना रु. 80,66,249 राशीचे काम करुन घेण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 260</u> :— आय.आर.डी.पी.अंतर्गत हनुमान नगर झोन क्र.3 मधील रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करण्याचे कामास्तव मे. एल.सी. गुरुबक्षाणी व मे. अमृत कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरापेक्षा 21.15 टक्के अधिक दराची रु. 258.77 लक्ष राशीच्या निविदेस तसेच दोन्ही निविदाकारास समप्रमाणात काम विभागून देण्यास स्था.स. ची मंजूरी असून सन 2008—09 अंतर्गत उपलब्ध प्रावधान रु. 100.00 लक्ष राशी पर्यतचे काम सिमीत ठेवण्यात आले. उर्वरित कामास्तव मे. एल.सी. गुरुबक्षानी यांना रु. 80,68,493/— व मे. अमृत कस्ट्रक्शन यांना रु. 78,08,105/— राशीचे कार्यादेश आर्थिक वर्ष 2009—10 मध्ये पद क्र. 477 अंतर्गत देण्यास्तव व प्रावधान उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 261</u> :— कर व कर आकारणी तसेच इतर विभागातुन वसुलीचे कामाकरीता आलेल्या कर्मचाऱ्यांनी माहे जानेवारी 2009 ते 31 मार्च 2009 (दुसरा व चौथा शनिवार, रविवार व इतर सार्वजनिक सुट्टयांच्या काळात) कर वसुलीचे काम केल्याबद्दल एकुण 23 (तेवीस) दिवसांचे अतिकालीन वेतन देण्यासाठी अंदाजे येणाऱ्या रु. 26,00,000/— (सव्वीस लक्ष रुपये) च्या खर्चास मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली तसेच यात जलप्रदाय विभागात जे कर्मचारी सुटीच्या दिवशी कामे करतात त्यांचा देखील समावेश करण्यात यावा असाही समितीने एकमताने निर्णय घेतला.

<u>ठराव क्रमांक 262</u> :— वार्ड क्र. 114, रमाबाई आंबेडकर नगर, टाकळी सिम येथील रस्त्यांचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता तयार कण्यात आलेल्या रु. 19,99,620/— च्या प्राकलनास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 263</u> :— वार्ड क्र. 115, शिवनगाव येथील महानगरपालिककेच्या शाळा इमारतीच्या दुरुस्तीच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रु. 1585700/— च्या प्राकलनास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 264</u>** :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर